जन
वाचन
आंदोलन

नवसाक्षर माला

गावोगावी पुस्तके घेऊन जाणारे आंदोलन !

पुस्तक हे एक साधन आहे -

* वाचनसंस्कृती विस्तारण्याचे,
* निरंतर शिक्षणाचे,
* आपले गाव फुलविण्याचे,
* प्रत्येक माणूस स्वावलंबी बनण्याचे,
* प्रेम, सहकार्य, व मानवतेची विशाल संस्कृती फुलवण्याचे,
* लोकशाही बळकट करण्याचे,
* जग जाणून घेण्याचे व ते बदलण्याचे,

ज्ञान-विज्ञान सर्वांसाठी, छोट्यांसाठी - मोठ्यांसाठी!
ज्ञान-विज्ञान सर्वांसाठी, स्त्रियांसाठी - पुरूषांसाठी

भारत ज्ञान विज्ञान समुदाय

कालयंत्र

भारत ज्ञान विज्ञान समुदाय

पुस्तकाचे नाव : कालयंत्र
लेखक : एच. जी. वेल्स
रूपांतर : डॉ. माया पंडित

संपादन सहाय्य : सुधीर बेडेकर
चित्रकार : अस्लम मुल्ला

संपादन : विनया मालती हरि
जवाआं/म १३ (दुसरी आवृत्ती)

प्रकाशन : मार्च, २००७
मूल्य रूपये : आठ रुपये

© भारत ज्ञान विज्ञान समुदाय

नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समुदायतर्फे चालवल्या जात असलेल्या 'नवसाक्षर माला' मोहिमेअंतर्गत निरंतर शिक्षण कार्यक्रमाकरिता प्रकाशित

प्रकाशक : विनया मालती हरि
राज्य सचिव, भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)
३०५, आधार अपार्टमेंट, नारायण पेठ, पुणे-४११०३०
फोन व फॅक्स: ०२०-२४४३४१३३/ई मेल : mahabgvs@sancharnet.in
मुद्रण स्थळ : एम आर अँड कंपनी, पुणे-३०/९८२२८४३१३८

अक्षर जुळणी : सुनिता जगदाळे

कालयंत्र

नमस्कार मंडळी. मी कोण म्हणता? माझी ओळख तर करून देणारचं आहे नीट. पण मला सांगा, तुमचं कसं काय चाललय? काही खरं नाही म्हणता? काळ मोठा कठीण आलाय, होय ना? पुढं जाऊन या जगाचं कसं होणार अशी चिंता पडलीय तुम्हाला. लोकांवर काय काय पहाण्याची वेळ येणार आहे, कोणास ठाऊक, असंही वाटतंय तुम्हाला.

समजा, पुढं काय होणार ते आजच कळलं तर? म्हणजे पोपटवाल्या ज्योतिषाकडून नव्हे, तर प्रत्यक्ष. अगदी स्वत:च्या डोळ्यांनी बघता आलं तर? पुढच्या शंभर वर्षांनंतर काय घडणार आहे? किंवा चारशे वर्षांनंतर? हजार वर्षानंतर काय घडेल हे आत्ताच बघता आलं तर?

फक्त पुढचचं कशाला? फार फार वर्षांपूर्वी काय घडलंय तेही बघायला मिळालं तर? शिवाजी, ज्ञानेश्वर, बुद्ध यांच्याबद्दल नुसतं ऐकतो आपण. पण ते घडत असताना आपण तिथं हजर राहाण्याकरता मागं मागं जाता आलं तर?

काळाच्या प्रवाहात असं मागंपुढं फिरता आलं तर? विश्वास नाही ना बसत? तुम्ही म्हणत असाल, हे कसं शक्य आहे? काहीतरी खुळचट कल्पना आहे ही, असंच वाटतं ना?

पण माझी गोष्ट मात्र अगदी उलट आहे. मी कोण आहे सांगू?

काळाच्या पाठीवर स्वार झालेला एक प्रवासी आहे मी.

भविष्यकाळात किंवा भूतकाळात कुठेही केव्हाही मी जाऊ शकतो. ते प्रसंग आणि ते जीवन प्रत्यक्ष पाहू शकतो. विश्वास नाही ना बसत? मग ऐका तर माझी गोष्ट...

मी एक शास्त्रज्ञ आहे. माझ्या या कहाणीची सुरूवात झाली एका संध्याकाळी. मी माझ्या मित्रांना माझ्या घरी खास बोलावलं होतं. सारेजण जमले. गप्पा सुरू झाल्या.

मी एक सरळ, बारीक रेषा काढली, आणि म्हटलं, ''एखाद्या रेषेची संपूर्ण माहिती कशी सांगता येईल?''

''हात्तिच्या, सोपं आहे'' मित्र म्हणाला, ''तिची लांबी सांगितली की झालं. यापेक्षा वेगळा आकार कुठं असतो तिला?''

''बरोबर, रेषेला जाडी किंवा रुंदी जवळजवळ नसतेच. त्यामुळं तिच्या लांबीचं माप सांगितलं की झाली तिची पूर्ण माहिती. रेषेला लांबी ही एकच मापण्याची गोष्ट असते. एकच मिती असते.'' मी म्हणलो. मग थोडं थांबून मी विचारलं, ''आणि चौकोनाला किती मिती असतात. समजा एकदम पातळ कागदाचा चौकोन आहे तर?''

''या कागदाला जाडी जवळजवळ नाहीचं. म्हणून चौकोनाचं वर्णन सांगायचं तर लांबी व रुंदी सांगावी लागेल. म्हणजे चौकोनाला मापण्यासारख्या दोन गोष्टी, दोन मिती आहेत.'' दुसरा मित्र म्हणाला.

''बरोब्बर! आणि लाकडाच्या या चौकोनी ठोकळ्याला किती मिती

आहेत?'' मी पुन्हा विचारलं.

''तीन मिती. ठोकळा घन आकाराचा आहे. त्याला लांबी आहे, रुंदी आहे, आणि उंची म्हणजेच जाडीदेखील आहे.'' मित्र म्हणाला.

''चूक. फक्त तीन नव्हे तर चार! ठोकळ्यात चार मिती आहेत'' मी म्हणालो. मित्र चकितच झाले. त्यांनी भुवया उंचावल्या.

''असं बघा'' मी म्हटलं, ''लांबी, रुंदी, उंची यांनी बनलेल्या ठोकळ्याचा घनाकार आपल्याला कळतो. या अवकाशात त्यानं कुठं, कशी जागा व्यापली आहे ते कळतं आपल्याला. पण ह्या ठोकळ्यानं काळाच्या प्रवाहातदेखील काही भाग व्यापलाय. तो महिन्यापूर्वी सुतारानं तयार कला तेव्हा अस्तित्वात आला. समजा आणखी महिन्याभरानं तो आगीत जळाला. तर त्याचा अर्थ काय? ठोकळा दोन महिने अस्तित्वात होता. त्याला लांबी, रुंदी, उंची म्हणजे घनता आहे आणि त्याला काळ ही आणखी एक मिती आहे. काळ नसेल तर ठोकळा आहे असं कसं म्हणता येईल? म्हणून ठोकळ्याला चौथी मितीदेखील आहे.''

मित्रांचे गोंधळलेले चेहरे पाहून मी म्हणालो,

''हे बघा, मी पुण्यात अमुक ठिकाणी आहे असं म्हटलं तर माझी जागा कळते. स्थळ कळतं. पण मी इथं सदासर्वदा नाही. मी आत्ता इथं आहे याचा अर्थ वेळ सांगावी लागते. म्हणजे कोणत्याही गोष्टीबद्दल माहिती सांगताना काळदेखील सांगावा लागतो. असं बघा, काळाचा प्रवाह चालूच आहे. माणूस मीच आहे. पण दहा वर्षापूर्वी मी १९८६ ह्या

बिंदूवर होतो. आज १९९६ या बिंदूवर आहे. आणि पाच वर्षांनी वेगळ्या म्हणजे २००१ या बिंदूवर असेन.''

''आता पुण्याहून मुंबईला, मुंबईहून कोल्हापूरला जाता येतं म्हणजे एका जागेवरून दुसऱ्या जागेवर जाता येतं. पण काळाच्या बाबतीत एका बिंदूवर दुसऱ्या बिंदूवर मागे वा पुढे जाता येत नाही असं आपल्याला वाटतं. खरं म्हणजे असं तुम्हाला वाटतं.'' आणि हसून मी थांबलो.

''म्हणजे? तुला नाही वाटत तसं?'' मित्र ओरडले.

''तेच तर सांगतोय'' मी सरसावून म्हणालो, ''त्याच्यासाठीच बोलावलयं मी तुम्हाला. या माझ्या प्रयोगशाळेत...''

माझ्या मित्रांचा माझ्यावर विश्वास बसत नव्हता. त्यांच्या चेहऱ्यावरून ते लख्ख दिसत होतं पण माझं मन मोडायचं नाही म्हणून ते प्रयोगशाळेत आले. तिथं टेबलावर एक विमानासारखी दिसणारी छोटी खुर्ची होती.

''ही माझ्या कालयंत्राची प्रतिकृती आहे. छोटं मॉडेल. पण तेही काम करतं. काळी कळ यंत्र थांबवण्यासाठी आहे,'' मी म्हणालो, ''पांढरी कळ दाबली तर हे यंत्र भविष्यात जाईल. या, दाबा.''

एका मित्रानं पांढरी कळ दाबली. झपकन ते छोटं यंत्र नाहिस झालं. मी म्हटल, ''पहा गेलं ते भविष्यात.''

''ह्यॅ! काहीतरीच. तू नजरबंदीचा खेळ करतोयस,'' सारे मित्र ओरडले.

''नाही विश्वास बसत?'' मी म्हटलं, ''मग चला तर वर्कशॉपमध्ये. तिथं खरखुरं कालयंत्र आहे. ते प्रयाणासाठी सज्ज आहे.'' मित्रांनी ते मोठं, संपूर्ण कालयंत्र निरखलं. एकमेकांकडे पाहून हसले.



''उद्या मी प्रवासास निघणार यातून.'' मी हसत म्हणालो. पण त्यांचा मुळीच विश्वास बसला नाही. माझी थट्टा करत ते निघून गेले.

प्रयाणाचा दिवस उजाडला. मी सज्ज होऊन यंत्रात बसलो. सर्व घड्याळं शून्यावर आणली. पांढरी कळ जराशी फिरवली. डोकं एकदम गरगरलं... सुचेनाच काही. मग मी काळी कळ दाबली. आणि सहज

समोरच्या घड्याळ्यात पाहिलं. अरे! आता मी बसलो तेव्हा तर दहाच वाजले होते. नि आता साडेतीन? याचा अर्थ मी भविष्यात तब्बल साडेपाच तास पुढं आलो होतो. माझं मशीन चक्क काम करत होतं. उत्साहानं मी पांढरी कळ जर आणखी जास्त वेळ दाबली. झू...म! आई... गं... केवढं गरगरतयं. माझी मोलकरीण एखाद्या रॉकेटसारखी पुढच्या दारातून आत आली नि मागच्या दारातून काम संपवून बाहेर गेली. मग भोवतालची दृश्यं भराभरा बदलत गेली. अरे.. हे काय, सगळ्या इमारती नाहीशा होऊन विस्तीर्ण पटांगण दिसतंय! डोळ्यांची पापणी लवण्यापूर्वीच सूर्य, चंद्र उगवताहेत अन् मावळताहेत... झाडं उगवताहेत.. त्यांचे भले मोठे वृक्ष होताहेत. अबब.. केवढं अजस्त्र नगर हे! काळ अतिशय वेगानं पुढे पळतोय. हे.. हे एकविसावं शतकं दिसतंय. बघता बघता उभं राहिलं आणि नाहिसं झालं! अरेच्या, हे काय? सगळीकडं बर्फ.. हिमयुग दिसतंय. वितळलं.. नि झाला सुरू तरंगत्या शहरांचा जमाना! बापरे... केवढं मोठं सरोवर... अतिप्रचंड.. अरे तेही सुकलं.

बाहेरची दृश्यं पहाताना भानच हरपलं. काळी कळ दाबायची विसरलोच मी! मी तर माझ्या जागेवरच आहे... बरोबर! मी अवकाशात होतो तिथेच बसलेला आहे.. कित्येक शतकापूर्वी माझं घर होतं त्याच जागी... पण काळ पुढे जातोय... अरे हे काय? एकदम यंत्रात धक्का बसला.. प्रचंड हिमवादळ... सुदैवान यंत्र मजबूत होतं म्हणून बरं! नाहीतर लागला असता आमचा निकालच! पण तेवढ्यात मी बाहेर फेकलो गेलो. वाऱ्याचा एक राक्षसी झोत आला. भोवताली प्रचंड मोठ्या इमारती होत्या.

क्षणभर काळीज विलक्षण धडधडलं! कोण रहात असेल बरं इथे? कलंडलेलं यंत्र नीट ठेवता ठेवता सहज मी यंत्राच्या घड्याळावर नजर टाकली. काळात किती बरं पुढं आलो? आई शप्पथ सांगतो.. विजेचा धक्का बसला जणू! डोळे विस्फारून बघत राह्यलो. डायलवर झगमगत्या आकड्यात वर्ष चमकत होतं. इ.स. ८०२,७०१! छे, इथून पळ काढायला हवा. अनाम भितीने काळजाचं पाणी पाणी झालं माझ्या. यंत्रात बसून पांढरी कळ दाबणार इतक्यात...

सुरेल आवाज ऐकू आले. धडधडत्या छातीवर हात ठेवत मी बाहेर पाहिलं... लहान मुलं? हसणारी, गाणारी...? ही मुलं आहेत की मोठी माणसं? यांची साऱ्यांची उंची तर जेमतेम चार फूट दिसतेय! माझी भीती कुठच्या कुठ पळून गेली! कुठल्याशा गोड पण संपूर्ण अनोळखी भाषेत चिवचिवत ती सारी माझ्या भोवती जमली. आणि एक दोन धिटुकल्यांनी मला चक्क हात लावून पाहिलं, मी खरोखरीचा आहे ना हे बघण्यासाठी! मग मात्र काहीजण कुतुहलानं यंत्राकडं वळले. मग मात्र मी घाईघाईने पुढं झालो. पटकन काळी नि पांढरी कळ काढून घेतली. हो, न जाणो ही पोरं फिरवायची कशीही नि भरायची आपली कंबख्तीच! दोन्ही कळी खिशात टाकून मी वळलो नि त्यांना निरखून पाहिलं. ओ.. हो! इतकी गोड, छोटी माणसं ... जणू बाहुल्या! एक धिटुकली पुढं आली आणि सूर्याकडं बोट दाखवून काही विचारू लागली! काय म्हणतेय ही? काही कळेल तर शप्पथ! मला तर ओ की ठो कळेना. मी आपला गोंधळून उभा राहिलो. तेवढ्यात सारीजण खारीसारखी इकडं तिकडं धावू लागली. फुलं गोळा

करायला लागली, नि क्षणात मला नखशिखांत फुलांत मढवून टाकलं!

त्यांना मी देवच वाटलो असणार बहुधा. लहान मुलांसारखी ती सारीजण हसत होती. खेळत होती.

मग एकानं माझा हात धरला. मला एका महाकाय करड्या इमारतीकडे आणलं. आम्ही आत गेलो... प्रचंड दालन.. लहान दगडी टेबलं मांडलेली नि टेबलावर फळ रचलेली. खाली छोट्या छोट्या बसकरांसारख्या गाद्या.

मंडळी शाकाहारी दिसताहेत. मग एकदमडोक्यात प्रकाश पडला. आपल्या युगात माणसांनी शिकार करून प्राणी संपवून टाकत आणलेच

होते. सर्व प्राण्यांचा आता खातमा झालेला दिसतोय. आता ह्यांना शाकाहारीच रहायला लागतयं!

मग त्यांच्यासोबत फळ खाताखाता मी त्यांची भाषा शिकायला सुरुवात केली. सोपं होतं. फळांकडे बोट दाखवायचं नि ते म्हणतील ते म्हणायचं! बरेच शब्द शिकलो.

बाहेर पडलो तर सगळीकडे फुलं नि भिरभिरणारी फुलपाखरं. रंगीबेरंगी झाडे वेली... अहाहा! उद्यानच जणू. पण ही माणसं, लहानमुलांएवढीच बुद्धिमत्ता दिसते यांची ! ह्यांची वाढ का होत नाही? त्यांची लोकसंख्याही फारच विरळ दिसतेय. नि आकार किती लहान! अंधार पडेपर्यंत मी फिरत होतो. फिरत फिरत एका पुतळ्याजवळ आलो. भूतकाळातल्या माझ्या घराजवळ होता तोच हा पुतळा बहुधा. कारण मी त्याच जागेवर होतो ना! आणि एकदम धक्का बसला. माझं कालयंत्र गायब झालं होतं. कुठंच दिसत नव्हतं. विलक्षण भयानं मी गोठून गेलो. कुठं गेलं यंत्र? या चिमुकल्या दोस्तांनी ढकलून तर दिलं नाही ना कुठ? मी खिसे चाचपले. नशीब! काळी व पांढरी कळ मी मघाशी खिशात काढून ठेवल्या होत्या? पुतळ्याचा अजस्त्र चेहरा माझ्याकडे पाहून छद्मी हसत होता. कुठाय यंत्र? कुठाय? वेडापिसा होत मी पुन्हा धावत त्या करड्या दगडी इमारतीत घुसलो. सारे चिमणे जीव झोपले होते. एकाला मी गदागदा हलवून उठवलं.. "कुठाय माझं यंत्र? बोल...कुठाय?" माझ्या आवाजानं दचकून जागे झाले. भयानं त्यांनी किंकाळ्या फोडायला सुरूवात केली. निराश होऊन मी परत फिरलो. बापरे! आता यंत्र नाही... बसा आता ... मरा

इथंच! फार हौस होती ना काळात फिरायची! मरा आता!

हताश होऊन एका झाडाला टेकून बसलो. तशीच रात्री कधीतरी झोप लागली. सकाळी जाग आली तेव्हा दोन छोटी माणसं माझ्याकडं वाकून पहात होती. मनातल्या आशेनं उचल खाल्ली. ''सांगा रे, माझं यंत्र कुठाय?'' पुन्हा पुन्हा मी विचारत राहिलो. पण रामा, शिवा, गोविंदा! अक्षर समजेल तर शपथ. नुसतं गोड हसत ती माणसं टाळ्या पिटत राहिली.

कपाळाला हात लावला. उठलो नि पुतळ्याकडं नजर टाकली. अरेच्या! पुतळ्याच्या पायथ्याशी खड्डा कसला दिसतोय? नि ह्या पावलांच्या खुणा? माझ्याचं. पण हे काय, हे ठसे कसले? दिसताहेत तर एखाद्या प्राण्याच्या पावलांसारखे. ठशांच्या मागावर मी पुतळ्याच्या चौथऱ्याजवळ गेलो. हं.. असं आहे काय! हा चौथरा आतून पोकळच दिसतोय! पण उघडायचं कस? मी माझ्या भोवतालच्या माणसांकडं नजर टाकली. विस्फारलेल्या घाबरलेल्या डोळ्यांनी ती सारी माना डोलावून 'नको नको' म्हणत होती. छे, यांची काय मदत होणार!

पुन्हा वळून मी चौथऱ्याजवळ गेलो. नि जीव खाऊन ढकललं. सूतभरही हलला नाही तो. निराश होऊन डोकं टेकलं... हे काय, पावलांचे आवाज? कुणीतरी चालतंय आत! पण बस्स! तेवढचं. दरवाजा (हो, दरवाजाच असणार तो) उघडला नाही तो नाहीच. मी झाडापाशी येऊन अतिशय निराशेनं बसकण मारली.

पण हातपाय गाळून चालणार नव्हतं. मी स्वत:लाच खडसावलं.

काय हे! लहान आहेस का असं वागायला? ऊठ, यंत्र परत मिळवायचं असेल तर प्रयत्न कर. दार उघडत नाही? ठीक आहे. दुसरे मार्ग शोध. शोधा म्हणजे सापडेल. इच्छा असेल तर मार्ग दिसेल, हे काय नुसतचं घोकलंस आजवर? प्रत्यक्षात तसं नको वागायला?

मग त्यांची भाषा शिकायला लागलो मी. इकडं तिकडं फिरून पहायला लागलो. झाडं, सरोवर, सौंदर्य, डोळे भरून पाह्यलं. हे जग सुंदर होतं. पण काहीतरी विचित्र वाटत होतं. मग मला काही ठिकाणी जमिनीत खूप खोल विवरं दिसली. आत गुडूप अंधार होता. ओ..हो, या विवरातून हवा जातेय खाली. कशासाठी? एखाद्या यंत्राचा यावा तसा भक् भक् भक् आवाज ऐकू येत होता. या खोल विवरांमध्ये हवा वाहून नेण्याची

यंत्र नि मोठाले नळ तर त्यात नाहीत? आणि ही माणसं? कोण यांच्यासाठी फळं ठेवतं? नि कपडे कोण देत यांना? काम करताना तर कुणीच नाही दिसत. बघाव तेव्हा खेळ, खाणं नि झोपणं. त्यांच्यात मुलं नि म्हातारी माणसं कशी नाही दिसत? शिवाय कुठं यंत्रबिंत्र नाहीत, गाड्याबिड्या काहीच कसं नाही दिसत?

माझ्या प्रश्नांची उत्तरं मला काही दिवसातच अगदी अचानक मिळाली.

एक दिवस मी तलावाच्या काठावर उभा राहून छोट्यांच्या आंघोळी पहात होतो. अचानक एक मुलगी बुडायला लागली. पण आजूबाजूची माणसं मात्र शांतपणानं पहात होती. तिला वाचवायचा प्रयत्न कुणीच करत नव्हतं. त्यांची आंघोळ, पाण्यात खेळणं, उड्या मारणं, हे सारे चालूच होते निवांतपणे! इकडं तिनं चारदोन गटांगळ्या खाल्ल्या. मग मात्र मला रहावेना. कपड्यानिशीच मी उडी मारली नि तिला ओढून बाहेर काढलं. पण तिला मृत्यूपासून वाचवलं याची कुणाला जाणीवदेखील झाली नाही! माझे आभार वगैरे मानणं तर दूरच राहिलं! 'निव्वळ कृतघ्न आहेत झालं' मी मनाशी म्हणालो. पण दुपारी ती पोरगी चांगली हाराभर फुलं गोळा करून आली. नि माझ्या गळ्यात त्यांचा हार करून घातला! बिचारी एवढ्याशा श्रमानं देखील थकली होती. माझ्याकडं पाहून ती गोड हसली, निरागसपणे. 'काय नाव तुझं? मी तिला विचारलं. 'वीणा' ती म्हणाली. नि फुलांशी खेळू लागली.

वीणाशी माझी मैत्री जुळली. तिला नि त्या साऱ्याच छोट्यांना भीती कशी ती माहीतच नव्हती. त्यांना रागवायला देखील येत नव्हतं. मी

ओरडलो, वेडीवाकडी तोंड केली तरी ती घाबरायची नाहीत. फक्त हसायची. मग लक्षात यायला लागलं. त्यांच्या मेंदूची वाढच नव्हती झालेली. त्यांना भीती वाटायची फक्त अंधाराची. दिवसभर हुंदडायचं नि रात्रभर त्या दगडी हॉलमध्ये झोपायचं.

धपू..धपू...धपू! रात्रीचा सन्नाटा चिरत आवाज आले. मी दचकून उठलो नि पाहिलं तर काही पांढऱ्या, धूसर आकृती वेगानं जात होत्या. मी त्यांच्यामागं धावलो. डोळ्यात बोट घातलं तरी काही दिसत नव्हतं. अचानक अंधारात डोळे चमकले. मला निरखणारे डोळे भोवती आहेत ही कल्पनाच काळजाचं पाणी पाणी करून टाकणारी होती. त्या आकृतीच्या मागं धावलो. नि अचानक सुर्रकन आवाज आला. 'अरे हे काय, हे तर विवर आहे' नि हा प्राणी लांबलचक शिडीवरून खाली उतरतोय. झपू..झपू...झपू.. गेला.

अचानक डोक्यात लख्ख प्रकाश पडला! अच्छा! मामला असा आहे तर! माणसांच्या शेवटी दोन जाती झालेल्या दिसतात. एक जमिनीवर राहणारी, छोटी, हसरी, बुजरी. दुसरी अंधाऱ्या विवरात राहणारी, भयानक, पाशवी. ही उत्क्रांती म्हणायची? की अधोगती? हा विकास आहे की विकृती?

दुसऱ्या दिवशी वीणाला मी विवराजवळ नेलं. पण ती घाबरून थरथर कापू लागली. "कोण लोक हे?" मी विचारलं.

"मारलोक" ती म्हणाली.

“नि तुम्ही?”

“गोय”

“कोण आहेत ते?” मी वीणाला खोदून खोदून माहिती विचारत राहिलो. पण छे! प्रश्नांच्या सरबत्तीनं गांगरून गेली ती आणि थरथर कापत रडत राहिली बिचारी!

आता हे कोडं सोडवायला हवं. ह्या प्रकरणाचा छडा लावायलाच हवा. बाजूला दिसणाऱ्या इमारती नेमक्या कसल्या आहेत? पाहूया तरी. आणि ही विवरं? उतरूनच पाहूयात.

हिम्मत केली. मी पायांनी चाचपून पाहिलं. शिडी! शाबास! चल खाली. मी पायऱ्या उतरायला लागलो. तर वीणाचा चेहरा एखाद्या ठिपक्यासारखा होत गेला. नि खालून यंत्राचा आवाज वाढत गेला. अरे पण हे काय? बोगदा? अचानक तोंडावर एक लिबलिबीत हात आला. मी क्षणभर भांबावलो. पण मग जिवाच्या करारानं कडी ओढली. भोवताली त्या रात्रीसारखे प्राणी! भराभर मागे सरले नि पळाले. अच्छा म्हणजे यांना प्रकाशाची भीती वाटते तर! छान. चला पुढे. मी बोगद्यात उतरलो नि चालायला लागलो. ती एक प्रशस्त खोली असावी. बरीच यंत्रं तिथं ठेवली होती. मी काड्या पेटवत पुढं जात होतो. चालता चालता अचानक माझ्या लक्षात आलं. पेटीत फक्त चार काड्या शिल्लक राहिल्या आहेत. आणखी काड्या आणल्या असत्या तर किती बरं झालं असतं! काडीच्या प्रकाशात दिसली टेबलं आणि त्यावर मांसानं भरलेल्या थाळ्या! म्हणजे हे मारलोक मांसाहारी आहेत तर! काडी विझली नि अचानक

एका मारलोकाच्या लिबलिबीत हातांनी मला पकडलं. मी पुन्हा काडी पेटवली. शी.. थंड पांढुरका चेहरा नि बटबटीत करडे गुलाबी डोळे! भीतीची थंड लाट माझ्या शरीरावरून गेली. इथून सुटायला हवं! काड्या पुरवून वापरायला हव्या. ह्या मारलोकांना उजेडाची भीती वाटते. मी गर्रकन वळलो नि आल्या वाटेनं धावत सुटलो. शिडीपर्यंत पोचेतो आणखी दोन काड्या संपल्या. ही तर शेवटची. बापरे.. मेलो.. माझे पाय धरून ओढताहेत... देवा.. लाथा झाडत मी कसाबसा वर चढलो. नि बाहेरच्या हिरवळीवर स्वत:ला झोकून दिलं.

मामला एकूण असा होता तर! हे मारलोक आणि वरचे गोयलोक.

माणसांपासून उत्क्रांत होत गेलेल्या दोन जाती! मला मांसानं भरलेल्या थाळ्या आठवल्या. अच्छा, म्हणजे ते मांस ह्या गोयलोकांचेच असणार. माझ्या अंगावर शहारा आला. मारलोकांचा बंदोबस्त करायला हवा. पण कसा! मला आठवली विवराजवळची ती हिरवी इमारत. वीणाला घेऊन मी त्या हिरव्या इमारतीत शिरलो. खूप यंत्र, हत्यारं नि शस्त्रं मांडून ठेवली होती. प्राण्यांचे सांगाडेही होते! वस्तुसंग्रहालयच होते म्हणाना! मी आनंदानं एक पिस्तुल उचललं पण ते पार गंजून गेलं होतं ते. इतरही हत्यारांची तीच गत झाली होती. मी जरा आणखी पाहिलं. मला हवी ती गोष्ट सापडली. काड्यापेटी नि इंधनाचा डबा..पेट्रोलसारख्या वासाचं इंधनं. नक्कीच ज्वलनशील असणार ते.

"चल वीणा, त्या पुतळ्याजवळ जाऊया नि उतरूयाच विवरात." हातातला पेट्रोलचा डबा, काड्यापेटी नि एक लांब दांडक असलेला हातोडा. मी वीणाबरोबर पुतळ्याजवळ आलो. रात्र पडली. रातकिडे किर्रर्र करू लागले. आमच्या भोवती त्या पांढऱ्या आकृत्या फिरू लागल्या. मारलोक होते ते. मी शेकोटी पेटवली. थोडा वेळ गेला. शेकोटी विझत आली नि मारलोक पुढे सरसावले. मी शेकोटीवर थोडं इंधन शिंपडलं. ज्वाला उसळल्या. मारलोक दूर पळाले. पण पुन्हा शेकोटी विझत आली, नि मारलोक पुन्हा चालून आले. मी खिशात हात घातला. आणि धक्काच बसला. माझी काडेपेटी गायब झाली होती. जिवाच्या आकांतानं हातातला हातोडा मी गरागरा फिरवू लागलो. एका हातानं वीणाला सांभाळत मी स्वत:च संरक्षण करत होतो. अन् अचानक हाताला



हिसका बसला. 'वीणा...' मी ओरडलो. ते वीणाला ओढत होते. चोहीकडून त्यांच्या झुंडी चालून येत होत्या. माझ्या अंगाला लिबलिबीत हातांचे वेढे पडत होते. आपला प्रतिकार क्षीण होतोय हे मला जाणवलं. मी निकरानं हातातला हातोडा फिरवत होतो. आणि अचानक प्रकाशाचा एक लोळ अंधाराला चिरत गेला. माझ्या शेकोटीतली आग पसरू लागली. बाजूचं वाळलेलं गवत भराभरा जळू लागलं. झुडपं पेटू लागली. नि भोवतालचे मारलोक पांगले. त्यांच्या झुंडीच्याझुंडी आगीला घाबरून सैरावैरा धावत सुटल्या. महाकाय लाटेसारखे त्यांचे लोंढे मला ओलांडून

पलिकडे जाऊ लागले. आणि त्या गदारोळात वीणाचा चिमुकला हात माझ्या हातातून सुटला. 'वीणा... वीणा...' आक्रोशात मी तिला हाका मारल्या. पण वीणा कायमची गेली होती! पहाटेच्या प्रकाशात चोहीकडं वणव्यानं केलेली राख मला दिसली. त्यानंच माझा जीव वाचवला होता.

पण माणसांचे गोय आणि मारलोक कधीपासून झाले? वरकरणी सुंदर दिसणारं हे जग सडलेलं दिसतयं. स्वत:ची प्रगती म्हणजे काय याचं भान माणसानं हरवलं. केवळ सुख, चैन यांच्यामागं लागून माणूस सुखलोलुप झाला. शरीरानं जिवंत पण मनानं अर्धमृत. त्यांना काही प्रश्नच उरले नव्हते! मन न वापरल्यामुळें ते हळूहळू खुरटत गेलं, गंजत गेलं. नि हे गोय झाले. वरती हे गोय आणि खाली ते मारलोक. गोयलोकांना गुरांसारखं पाळून भुकेसाठी त्यांना मारलोक मारतात. खुनशी, पाशवी मारलोक. हे असेच नष्ट होणार. माणसा रे माणसा! बघ तुझा भविष्यातला चेहरा.

विचारांच्या तंद्रित मी पुतळ्याजवळ पोचलो. काय आश्चर्य! चौथऱ्याचं गुप्त दार सताड उघड होतं. मी आत गेलो. माझा माझ्या डोळ्यावर विश्वासच बसेना. माझं कालयंत्र तिथं होतं. मी आत गेलो. यंत्रात बसलो. अन् चौथऱ्याचं दार दणकन् बंद झाल. अच्छा म्हणजे हा मारलोकांचाच डाव दिसतोय. त्यांच्या विकट हसण्याचा आवाज मला ऐकायला आला. माझे हातपाय गारठले. तेवढ्यात खिशात हाताला जड काहीतरी लागलं. डोक्यात प्रकाश पडला. काळी नी पांढरी कळ! झटकन मी त्या यंत्राच्या खाचांत बसवल्या. एवढ्यात मारलोकाने माझ्यावर झडप घातली. सारं बळ एकवटून मी त्याला निकरानं एक ठोसा मारला. त्याचं डोकं फुटलं

असावं, तो भेलकांडत दूर गेला. मी पांढऱ्या कळीला हात घातला नि हुश्श... कळ फिरवली पण उलटी फिरवण्याऐवजी सुलटी. मी काळात पुढेपुढेच जाऊ लागलो.

हे काय? तारे दिसताहेत. पण चंद्रसूर्य मलूल निस्तेज होत चाललेत! मी यंत्र थांबवलं. बाहेर पाहिलं. भकास वैराण जग. निर्मनुष्य. नि हे काय? राक्षसी फुलपाखरू नि तसलाच राक्षसी खेकडा. अचानक गालावर टोचलं. एका खेकड्याच्या अजस्त्र नख्या मला बोचकारू पहात होत्या. मी झटक्यात कळ फिरवली. पुढं पुढं .. भविष्यात आणखी पुढं! कोटी वर्ष पुढं. सूर्याचा नुसता लाल विझता गोळा. खडकावर तुरळक शेवाळ. जिवंतपणाची तेवढीच खूण. बाकी जीवन नष्ट झालयं. सजीवांच नामोनिशाणही नाही कुठं. आता अंधारयुग. सूर्य नाही. संपूर्ण काळोख. पृथ्वीवर फक्त भीषण, कधी न संपणारं बर्फाळ युग. थंड पृथ्वीचा मृत गोळा!

मला ते दृश्य पहावेना. मी कळ भराभर उलटी फिरवली. समोरचं जग झपाट्यानं बदलत गेलं. पुन्हा ती अजस्त्र शहरं.. सरोवरं.. नि पोचलो एकदाचा माझ्या नि तुमच्या काळात! या शतकात. माझ्या भोवतीच्या परिचयाच्या इमारती. त्यांच्या खाणाखुणा न्याहाळल्या आणि धक्काच बसला. मी ज्या घटकेला प्रयाण केले होतं ती घटका मला उलट्या क्रमानं दिसू लागली. माझ्या मोलकरणीच्या सगळ्या हालचाली मला उलट क्रमानं दिसल्या. नि एकदाचं मी यंत्र थांबवलं. अरे पण हे काय? मी तर वर्कशॉपच्या दक्षिणेच्या कोपऱ्यात होतो. उत्तरेच्या कोपऱ्यात कसा काय?



बरोबर! मारलोकांनी माझं यंत्र बाहेरून चौथऱ्यात आत हलवलं होत ना! म्हणून पडला हा फरक!

मी यंत्रातून बाहेर आलो. बैठकीच्या खोलीत पेपर पडला होता. तो उचलून तारीख पाहिली. बरोबर एक आठवडा.

शेजारच्या खोलीतून आवाज येत होते. माझे मित्र! खरच की त्यांना बोलावलं होतं नाही का मी आज! मी आत गेलो.

''काय रे, कुठं गुल झाला होतास?'' एक मित्र म्हणाला.

''अरे, कालयंत्रात बसून भविष्यात सहलीला गेलो नव्हतो का मी?'' मी हसून म्हणालो.

''मार थापा'' त्यांचा विश्वास बसला नव्हता. मग मी त्यांना सर्व कहाणी सांगितली, अथपासून इतिपर्यंत.

''कसा विश्वास ठेवावा आम्ही? पुरावा आहे काय?'' पुरावा? मी सहज खिशात हात घातला. फुलं! वीणानं खिशात घातलेली! ''हा घ्या पुरावा. पहा ही फुलं'' मी विजयी स्वरात म्हटलं.

''झेंडूची? की शेवंतीची? पण नाही. वेगळीच आहेत ही अगदी'' एक मित्र म्हणाला. ते सारेच गोंधळले. ''तुला बहुधा स्वप्न पडलं असावं.'' मित्र गेल्यावर पुन्हा मी वर्कशॉपमध्ये गेलो. आता मला यंत्र स्वस्थ बसू देणार नव्हतं. काय स्वप्न! कसं पडलं? आयुष्य स्वप्नच आहे म्हटलं तर! याचा शोध घ्यायला हवा. कालप्रवाहात हिंडायला हवं. भूतकाळातले डायनॉसोर नि इतर अजस्त्र प्राणी पहायला हवे. नि मानवाची उत्क्रांती. अन् हो... वीणाचाही शोध घ्यायला हवा. मानवजात त्यावेळी नामशेष होईल खरं... पण तरीदेखील माणसाच्या ह्रदयात कुठंतरी प्रेमाचा ओलावा असेलच! वीणा हा त्याचा जिवंत पुरावाच नाही का? तिला शोधलंच पाहिजे!

तेव्हा बरयं मंडळी, मला माझ्या कालयात्रेवर निघायलाच हवं आता. मी परत येणार की नाही म्हणता? कोण जाणे...! रामराम....

❖❖❖